The South Asian Academic Research Chronicle ISSN 2454-1109

A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal

Vol 11.Issue 3; March 2024

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

# संत तुकारामांच्या अभंगातील 'अनुभव' विचार

**प्रा.सखाराम बाबाराव कदम,**

मराठी विभाग,

कै. रमेश वरपूडकर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सोनपेठ, जि. परभणी

'नका दंतकथा सांगू येथे कोणी | कोरडे ते मानी बोल कोण ||

अनुभव येथे व्हावा शिष्टाचार | न चलती चार आम्हापुढे ||'

संत तुकारामांची ही भूमिका एखाद्या वैज्ञानिकाइतकी स्वच्छ आणि स्पष्ट होती. म्हणूनच अनुभवजन्य शिक्षण व ज्ञान विद्यार्थ्यांना दिले गेले पाहिजे असे त्यांना अभिप्रेत होते असे मला वाटते. घरात एखादे निसर्गचित्र लावून निसर्गाच्या सानिध्यात जाणवणाऱ्या प्रसन्नतेचा अनुभव घेता येईल का? पुष्पगुच्छाचे एखादे चित्र बैठकीत ठेवून त्याच्या सुगंधाचा आस्वाद घेता येतो का?

'अनुभवावाचून सोंग संपादने | नव्हे हे करणे स्वहिताचे ||

परिमळे जरी जाय भूक | तरी का हे पाक घरोघरी ||'

केवळ पावसाची गाणी ऐकून पावसात भिजण्याचा आनंद अनुभवता येईल का? खाद्यपदार्थांची केवळ प्रतिमा पाहून जीभेची तृष्णा भागवता येईल का? तर वरील सर्व प्रश्नांची उत्तरे नकारार्थी मिळतील. कारण इथे कुठेही रसरशीत जिवंत अनुभव नाही. जाणिवा समृद्ध करणारी अनुभूती नाही. केवळ शाब्दिक ज्ञानाने किंवा पुस्तकी वाचन वा पारायणाने जीवनाचा सर्वांगीण परिचय झाला म्हणणे हे अतिशयोक्त ठरेल. म्हणूनच जगद्गुरु संत तुकोबा अनुभवरहित ज्ञानाला नकार देत अनुभवजन्य ज्ञानाचा स्वीकार करण्याची आवश्यकता वरील अभंगातून प्रतिपादन करतात. केवळ कपोलकल्पित कथा, समाजात पसरलेली दंतकथा वा ऐकीव माहितीवरून, अनुभवरहित बोलण्याचा म्हणूनच जगातल्या बहुतेक विचारवंतांनी, संतांनी धिक्कार केला आहे. संत तुकारामांनी जशी इतरांकडून अनुभवाची अपेक्षा केली तशीच स्वतःवरही अनुभवाशिवाय काही सांगायचे नाही अशी मर्यादा घालून घेतलेली दिसते. कारण पुढील अभंगात तुकोबा म्हणतात,

'अनुभवे आले अंगा | ते या जगा देतसे ||

नव्हती हाततुके बोल | मूळ ओल अंतरीची ||'

विज्ञानाच्या शिक्षणामध्येही विश्व जाणण्याच्या काही गोष्टी केवळ प्रयोगाने नाही तर प्रत्यक्ष अनुभूतीने समजून घ्याव्या लागतील हे मान्यच केले आहे. प्रयोगाकडून प्रत्यक्षानुभूतीकडे विज्ञानाची ही वाटचाल प्रमाण मानली जाते. अनुभव हा शब्द मुळातच 'अनु' आणि 'भव' या दोन शब्दांपासून बनला आहे. यातील 'अनु' म्हणजे **तत्सदृश्य** आणि 'भव' म्हणजे **होणे**. "ज्या वस्तूचा अनुभव घ्यायचा आहे तिच्याशी मानवीवृत्ती एकरूप होणे म्हणजे अनुभव". या अनुभवाचे देखील यथार्थ अनुभव आणि अयथार्थ अनुभव असे दोन प्रकार मानले जातात. यथार्थ अनुभवाचे पुन्हा प्रत्यय, अनुमिती, उपमिती व शब्द असे चार प्रकार आहेत तर अयथार्थ अनुभवाचे संशय, विपर्याय आणि तर्क असे तीन प्रकार आहेत. अनुभूती मात्र यापेक्षा थोडीशी निराळी ठरते. इंद्रियातित, अनुभवजन्य ईश्वराचा साक्षात्कार

The South Asian Academic Research Chronicle ISSN 2454-1109

A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal

Vol 11.Issue 3: March 2024

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Sonpeth Dist.Parbhani

म्हणजे अनुभूती होय. ही एक प्रकारची मनाची प्रवृत्ती आहे. म्हणून अध्यात्मिक अनुभवाचे वर्णन करता येत नाही. जीवनातील सर्व अनुभवासाठी चांगला अनुभव व वाईट अनुभव अशी विभागणी माणूस नेहमी करत असतो. पण जीवनातल्या सर्व अनुभवासाठी स्वागतशिल असणाऱ्या माणसांचेच जीवन अधिक समृद्ध व सुखी होत असते. भूतकाळातील अनुभवाची शिदोरी ही वर्तमानात वागताना आणि भविष्याचा वेध घेतानाही उपयुक्त ठरते. मगच **'अंतरीचे धावे, स्वभावे बाहेरी | धरीताहे परी, आवरेना ||**

यातील मर्म कळते. अनुभवाच्या पाठबळावर ताऊन सुलाखून निघालेली ही संतमंडळी आत्मविश्वासाने पावले टाकीत काही अंदाज व्यक्त करतात व ते सहसा चुकत नाहीत. माणसाला येणारा प्रत्येक क्षण नवा अनुभव घेऊन येत असतो, म्हणूनच जगण्यात नाविन्य टिकून आहे. हजारो पुस्तके वाचून मिळणाऱ्या ज्ञानापेक्षा एक जिवंत अनुभव खूप काही शिकवून जातो. शाळा महाविद्यालयातून पुस्तक शिकवले जातात पण हे शिकूनही बेकार नावाची पदवी त्यांना बहाल केली जाते.

'शिकल्या बोलाचे सांगतील वाद | अनुभव भेद नाही कोणा ||'

कारण अनुभवावर आधारित शिक्षण त्यांना मिळालेले नसते. म्हणूनच प्राचार्य शिवाजीराव भोसले म्हणत "चिमणीची पिलं चाळीस दिवसात आकाशात भरा-या घेतात आणि माणसे चाळीस वर्षाची झाली तरी उत्कर्ष करू शकत नाहीत, कारण चिमणीच्या पिल्लांना पंख आतून फुटलेले असतात आणि माणसांना पदव्या बाहेरून लावलेल्या असतात. म्हणून आतून अज्ञानाचे पंख निर्माण करणारे आणि पंखात बळ देणारे अनुभवजन्य शिक्षण विद्यार्थ्यांना दिले गेले पाहिजे" विद्यापीठाकडून मुलांना नुसते पदव्या दिल्या जातात पण जीवनात संघर्ष कसा करावा? अडीअडचणीच्या प्रसंगाला तोंड कसे द्यावे? अंगभूत कौशल्याची वाढ कशी करावी? याबद्दल एक शब्द सांगितला जात नाही. हे सारं चित्र बदलण्यासाठी शिक्षणाला अनुभवाची जोड देण्याचे महत्त्व संतांसहित जगातल्या सर्व विचारवंतांनी सांगितले पण त्याकडे गांभीर्याने बघायला हवे! व्यक्तीच्या लौकिक व्यवहारात किंवा बाह्य जीवनात येणारे अनुभव त्याला समृद्ध करीत असले तरी त्याच्या आंतरिक जीवनातले अलौकिक अनुभव त्याला अधिक परिपक्व आणि परिपूर्ण बनवीत असतात. जीवन जगण्याचा खरा अर्थ त्याला समजावून सांगत असतात. हे अनुभव ज्याचे त्याने घ्यायचे असतात.

- **संत तुकारामांच्या अभंगवाणीतील अनुभव संचित :-**

मोक्ष प्राप्तीसाठी साधना करणाऱ्या योग्याचा अनुभव, नृत्याची साधना करणाऱ्या नर्तकीचा अनुभव, अमृताला मूर्त रूप देणाऱ्या शिल्पकाराचा अनुभव, स्वरांची आणि सुरांची साधना करणाऱ्या गायकांचा अनुभव, कथा कादंबरी लिहिणाऱ्या लेखकाचा अनुभव, साहित्यकृतीशी तन्मय झालेल्या वाचकाचा अनुभव, सर्व अंगभूत कौशल्यांसह रुग्णांवर जटिल शस्त्रक्रिया करणाऱ्या डॉक्टरांचा अनुभव हा वेगवेगळा असतो. हे सारे करीत असताना मिळालेल्या आनंदाची, समाधानाची अनुभूती वेगळी असते. तिची गुणवत्ता, पातळी आणि स्तरही वेगळा असतो. मानवी मन हे संपूर्ण ज्ञान प्राप्तीचे साधन नाही असे म्हणत योगी अरविंदांनी 'आहे त्या स्तरावरून जीवात्म्यास उच्च स्तरावरून येणे म्हणजे साधना' असं बजावले. मनामुळे

The South Asian Academic Research Chronicle ISSN 2454-1109
A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal
Vol 11.Issue 3; March 2024

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

केवळ अंशात्मक ज्ञान होऊ शकते. परमोच्च समाधानाची, शांततेची आणि आनंदाची अनुभूती घेण्यासाठी माणसांनी बहिर्मुखता टाळून अंतर्मुख झाले पाहिजे. याबद्दल संत तुकारामाचे प्रमाण लक्षात घ्यावे लागेल.

'तुका म्हणे होय | मनाशी संवाद || आपुलाची वाद | आपणाशी ||' किंवा

'रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग | अंतर्बाह्य मन आणि जग ||'

संत तुकारामांच्या वागण्या बोलण्यात यत्किंचितही फरक पडत नव्हता. त्यांचे मन निर्मळ असल्यामुळे कोणाचीही फसवणूक आणि दिशाभूल करण्याची त्यांची इच्छा नव्हती. माणसाच्या बोलण्यात आणि वागण्यात अंतर असू नये या गोष्टीवर तुकारामांचा मोठा कटाक्ष होता. पुढील अभंग या दृष्टीने पहावा...

'इंद्रियांसी नेम नाही | मुखी राम म्हणोनि काई? ||
जेवी मासीसंगे अन्न | सुख नेदी ते भोजन ||
कीर्तन करावे तसे | करुनी दावावे ||'

ज्याचे आपल्या इंद्रियावर नियंत्रण नाही त्यांने तोंडाने ईश्वराचे नामस्मरण केले तरी त्याचा काय उपयोग होणार? कोणी माशी पडलेले अन्न खाऊ लागला तर ते जेवण सुख देणार नाही म्हणून जसे कीर्तन करावे तसे वागून दाखवावे. वागण्या बोलण्यात विसंगती असू नये! अशी वागणे हेच अखेरी सर्वांच्या हिताचे असते. पण, हा सिद्धांत इतरांना उपदेश करणा-या लोकांच्या बाबतीत मात्र नुसता अपेक्षा करणारा नव्हे तर बंधनकारकच म्हटला पाहिजे. मनुष्य जसे बोलतो तसाच तो वागला तर लोक त्याच्यावर विश्वास ठेवतात. त्याच्या उपदेशानुसार आचरण करतात आणि स्वतःचे हित साधतात. व्यावहारिक उपदेश करणारांपेक्षा कीर्तन वगैरे करणाऱ्यांवर तर याबाबतीत फार मोठी जबाबदारी असते. कारण ते मोठ मोठी तत्वे सांगत असतात. ते त्याग करण्याच्या गोष्टी सांगतात. विकार जिंकण्याच्या गोष्टी बोलतात. आता त्यांच्या आचरणात जर हे सर्व येत नसेल तर ते नुसते व्यर्थ नसते तर ते लोकांची फसवणूक करणारेही ठरते.

ज्ञानाविषयी तुकारामांनी जो विचार केला होता त्याचा पाया म्हणजे त्यांनी आचरणाला वा अनुभवाला दिलेली महत्त्व होय. कोणत्याच बाबतीत वरवरच्या पोकळ आणि दिखाऊ गोष्टीचे स्तोम माजवणे त्यांना पसंत नव्हते. ज्ञानाच्या क्षेत्रातही नुसत्या शब्दांपेक्षा त्याच्या अर्थाला आणि नुसत्या बोलण्यापेक्षा आचरणाला ते महत्त्व देत असत.

'बोलाचीच कढी बोलाचाच भात | जेवूनिया तृप्त कोण झाला? ||'

असे प्रश्न ते विचारतात. नुसत्या पोकळ शब्दांनी आपल्या हाताशी काही लागत नाही. शब्द हे अर्थाचे वाहक असून शब्दाच्या मदतीविना अर्थाला प्रकट होणे फार अवघड आहे आणि म्हणून भाषेमध्ये अथवा विचाराच्या संक्रमणामध्ये शब्दालाही खूप महत्त्व आहे. पण जे शब्दाजवळच अडखळतात, तिथेच रुतून बसतात, ते जीवनाच्या खऱ्या मर्माला स्पर्श करू शकत नाहीत. आपण ज्या ग्रंथाचे, वचनांचे पाठांतर केलेले असेल त्या ग्रंथातील सिद्धांत अंतकरणाला भिडले पाहिजेत. रक्तात भिनले

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

पाहिजेत. त्या सिद्धांतांनी माणसाचे आचार विचार बदलले पाहिजेत. संस्कृती बदलली पाहिजे. म्हणजेच माणूस अधिक उंच झाला पाहिजे हीच एक आस संत तुकारामांच्या मनात असावी, असे वाटते.

संत तुकारामांनी जसे ग्रंथ प्रामाण्य नाकारले तसेच वर्णव्यवस्थेला देखील विरोध केला. सर्व माणसे समान आहेत त्यांच्यामध्ये वर्णभेद नाही. पशुपक्षांमध्ये जशा जाती असतात तशा जाती माणसांमध्ये नाही ती इत्यादी प्रकारचे विचार मांडून भगवान बुद्धांनी वर्णव्यवस्थेला हादरा दिला होता. तुकारामांनी ही अतिशय स्पष्ट शब्दात संमतीची भूमिका घेतली आहे. त्यांची पुढील काही वचने पाहिली तर हे स्पष्ट होईल. जसे-

'अवघी एकाचीच विण | तेथे कैचे भिन्नभिन्न ||'
'विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म | भेदाभेद भ्रम अमंगळ ||'
'शुद्धाशुद्ध निवडे कैसे ? | चर्ममांस भिन्न नाही ||'
'वर्ण अभिमाने कोण जाले पावन | ऐसे द्या सांगून मजपाशी ||'
'वर्ण कुळ जाती याचा अभिमान | त्यजावा सन्मान लौकिकाचा ||'

असे विचार ठिकठिकाणी तुकाराम गाथेत आपणास सापडतात. त्यांनी आयुष्यभर सामाजिक समतेचा पुरस्कार केला. त्यासाठी सामाजिक परिवर्तन करण्याचाही प्रयत्न केला. देव स्वतःही वर्णजातीचे भेद मानत नव्हता आणि त्याचे भक्तही वर्णजातीचे भेद मानत नव्हते हे तुकारामांनी अनेक अभंगातून स्पष्ट केले आहे. तुकारामांनी स्त्रियांनाही आत्मविकासाचा अधिकार आहे. अशी नि:संदिग्ध घोषणा आपल्या अभंगवाणीतून केली. म्हणूनच संत कान्होपात्रा तुकारामांच्या आदराचा विषय ठरते.

'ब्राह्मण क्षत्रिय वैश्य शूद्र चांडाळा आहे अधिकार | बाळे नारीनर आदि करोनि वेश्याही ||'

संत तुकारामांनी कर्मकांडालाही विरोध केला. त्यांनी यज्ञसंस्था निष्प्रभ करण्याचे कार्य फार मोठ्या प्रमाणात केले. यज्ञातून तीळ तांदळाच्या आहुती देऊन सुद्धा जर मनातील क्रोध आणि काम मावळत नसेल तर ते माणसं दुर्जन मानावीत असा रोकडा उपदेश ते करत असत. पापी माणसाच्या पापाचे क्षालन तीर्थातील स्नानाने होणार नाही. तर त्यासाठी मन शुद्ध असणे महत्त्वाचे असे ते मानत. जो शुद्ध असतो, निर्मळ कर्म करणारा असतो त्याचे कोणतेही व्रत्त नेहमी पूर्ण होते, ही त्यांची धारणा कायम होती. हे खालील विविध अभंगातून दिसून येईल.

'जाऊनिया तीर्था काय तुवा केले?| चर्म प्रक्षाळिले वरी वरी ||'
'तीर्थी धोंडा पाणी | देव रोकडा सज्जनी ||'
'काय धोविले बाहेरी | मन मळाले अंतरी||'

संत तुकारामांनी आजीवन चमत्कारांना विरोध केला. ज्योतिष्य, मांत्रिकविद्या, शकुन, नवस इत्यादींना नाकारले.

'सांगो जाणती शकुन | भूत भविष्य वर्तमान ||
त्यांचा आम्हासी कंटाळा | पाहो नावडती डोळा ||'

अंगात येणे शकुन सांगणे वगैरे गोष्टी संतांकडून केल्या गेल्या नाहीत. आणि जे कोणी असे करतात त्यांच्याजवळ ईश्वर असत नाही हे लोकांना त्यांनी तळमळीने सांगितले.

**संत तुकारामांच्या अभंगातील 'अनुभव' विचार**

**प्रा.सखाराम बाबाराव कदम,**

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

'डोई वाढवूनि केश | भूते आणिती अंगास ||
तरी ते नव्हती संतजन | तेथे नाही आत्मखुण ||
मेळवूनी परनारी | शकुन सांगती नानापरी ||
तुका म्हणे ऐसे मायेचे मैंद | नाही त्यापाशी गोविंद ||'

**सारांश**; संत तुकारामांचे अवघे आयुष्य विवेकावर आधारलेले होते. लोकांच्या कल्याणाचा ध्यास घेऊन ते जगले. त्यांनी ईश्वराची भक्ती केली पण सत्कृत्ये करणाऱ्या संतांच्या स्वरूपातच ईश्वराचे रूप पाहिले. जे दुखी कष्टी लोकांचे अश्रू पुसतात त्यांनाच त्यांनी संत मानले. स्वर्ग, मोक्षापेक्षा इहलोकीचा देह महत्त्वाचा मानला. बाहय कर्मकांडांपेक्षा मनाचे शुद्धता श्रेष्ठ मानली.भक्तीच्या क्षेत्रात परंपरागत दृष्टिकोनामध्ये आपल्या अभंगातून उलथापालथ घडवून आणली. कर्मकांडाच्या अवघड मार्गापेक्षा भक्तीचा सोपा मार्ग त्यांनी सांगितला. उच्च नीचतेच्या कल्पना बाजूला सारून हा मार्ग त्यांनी सर्वांसाठी खुला असल्याचे ठणकावले. इथे सर्वांना अधिकार असल्याची उद्घोषणा केली.भक्ताला इथे ईश्वरापर्यंत सहजपणाने पोहोचता येते. हेच संत तुकारामाचे अनुभवसंचित पिढ्यानपिढ्या आपणास पुरेल, हा आशावाद व्यक्त करून शोधनिबंधाच्या मर्यादेत थांबणे मी इष्ट मानतो.

**संदर्भसूची**:-

1) देखणे, रामचंद्र : 'पालखी:अनुभवाच्या गावी' (लेख) दै.महाराष्ट्र टाइम्स, दि. १२ जुलै २०२१.
2) जोशी, मिलिंद : दै. लोकसत्ता मधील लेख दि. १० ऑगस्ट २०१३.
3) साळुंखे, आ.ह.: 'तथागत बुद्ध आणि संत तुकाराम', लोकायत प्रकाशन, सातारा, प्रथमावृत्ती जून २०१२.
4) संत तुकाराम : 'श्री तुकाराम बाबांच्या अभंगाची गाथा', शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई, द्वितीय आवृत्ती,१९९१.

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar
(ACS) College, Sonpeth
Dist. Parbhani (MS)

**संत तुकारामांच्या अभंगातील 'अनुभव' विचार**

**प्रा.सखाराम बाबाराव कदम,**

SSCP/INS2024/MAR 622

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड संलग्नित

म. शि. प्र. मंडळाचे

# श्री शिवाजी महाविद्यालय, परभणी

(NAAC Re-accredited IV Cycle 'A+' Grade : 3.47 CGPA)

[UGC - College with Potential for Excellence]

## मराठी विभाग आयोजित

**एक दिवसीय आंतरविद्याशाखीय राष्ट्रीय चर्चासत्र : 'संत साहित्याची प्रासंगिकता'**

# ॥ प्रमाणपत्र ॥

प्रमाणित करण्यात येते की, श्रीमान/श्रीमती/प्रो/डॉ. प्रा. कदम सखाराम बाबाराव

कै. रमेश वरपुडकर महाविद्यालय, सोनपेठ जि. परभणी यांनी दिनांक १६ मार्च २०२४ रोजी

मराठी विभाग आयोजित एकदिवसीय आंतरविद्याशाखीय राष्ट्रीय चर्चासत्रामध्ये सहभाग नोंदविला/शोधनिवंध वाचन केले.

शोधनिदंधक शीर्षक : संत तुकारामांच्या अभंगातील 'अनुभव' विचार

धन्यवाद

प्रा.डॉ. राजू वट्टे
सह-समन्वयक

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar
(ACS) College, Sonpeth
Dist. Parbhani (MS)

प्रा.डॉ.प्रल्हाद भोपे
समन्वयक, मराठी विभाग प्रमुख

डॉ.बाळासाहेब जाधव
प्राचार्य

शनिवार, दि. १६ मार्च २०२४

Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani